(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# " महात्मा गांधी प्रणित नई तालीम शिक्षण पध्दती एक अभ्यास "

**सौ. वर्षा सूर्यकांत मस्के,** सहा. शिक्षिका, ताराराणी विद्यापीठाचे उषाराजे हायस्कूल, कोल्हापूर.

..........................................................................................................

**सारांश-**

महात्मा गांधी हे स्वातंत्र्योध्दा, समाजसुधारक शिक्षणतज्ञ, राजकीय विचारवंत अर्थतज्ञ म्हणून ओळखले जातात. भारतीय शिक्षणपध्दती ही मूलभूत शिक्षण देणारी असावी असे त्यांचे ठाम मत होते. व्यक्तीला मिळणारे शिक्षण हे पुस्तकी ज्ञानावर नव्हे तर त्याला जगण्यासाठी सामर्थवान बनविणारे असावे असे त्यांनी सांगितले आहे. जगासमोर 'नई तालीम' ही संकल्पना मांडताना शिक्षणातील वर्तमान स्थिती व भविष्यात आवश्यक बदलांचे वर्णन यामध्ये केले आहे.

वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेत म. गांधी यांनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले. महात्मा गांधी यांची वर्धा योजना ही मुलोगामी शिक्षण, बुनियादी शिक्षण, मुलभूत शिक्षण नई तालीम या विविध नावांनी ओळखली जाते. सदरच्या शिक्षण पध्दती विषयी विचारांची चिकित्सक मांडणी या शोध निबंधात केली आहे.

**प्रस्तावना -**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महात्मा गांधीजी यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण असे आहे. सत्य आणि अहिंसा या दोन तत्वांचा अवलंब करून भारतीय स्वातंत्र्यासाठी लढणारे महात्मा गांधीजी हे अग्रगणी व्यक्तीमत्व होते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात ब्रिटीशांनी शिक्षण पध्दती सुरू केली. मेंदूचा वापर न करता सांगेल ते काम करणारे असे मनुष्यबळ निर्माण करणे. ह्या शिक्षण पध्दतीचा उद्देश होता. पण महात्मा गांधीजींनी भारतीय शिक्षण प्रणालीला नवी बैठक दिली ती म्हणजे 'नई तालीम'. महात्मा गांधी यांना स्वतंत्र भारतात 'नई तालीम' ही शिक्षण पध्दती आणायची होती 'नई तालीम' म्हणजेच नवे शिक्षण जे पूर्णपणे भारतीय शिक्षण व्यवस्थेला धरून होते.

आजच्या 'घोका आणि ओका' या प्रकारच्या स्मृति केंद्रीत शिक्षण पध्दतीतून बाहेर पडणाया पदवीधरांमध्ये संशोधक वृत्तीची, विधायक विचारांचा अभाव पहावयास मिळतो.

एका राष्ट्राच्या मूलभूत गरजा भागवेल असे शिक्षण ज्या मध्ये विद्यार्थाला स्वावलंबन शिकविले गेले पाहिजे. समाजाला उपयोगी पडेल असे कुठलेही काम जे शिक्षणाच्या माध्यामातून विद्यार्थाच्या हाती असेले पाहिजे असे विचार महात्मा गांधीजी यांचे होते.

**महात्मा गांधीजी यांचे शिक्षण विचार :-**

- Education for life.
- Education through life.

बालक हा समाजाचा घटक आहे. त्यांचा चौहू बाजूने विकास होणे आवश्यक आहे. हा विकास होण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा हक्क आहे. प्रत्येकास शिक्षणाचा हक्क मिळाला तरच स्वस्थ समाज निर्माण होऊ शकेल. जीवनातल्या सर्व प्रश्नांना भिडणारे शिक्षण, श्रमनिष्ठा, अहिंसा, सहकार हे मुलांमध्ये रुजविणारे शिक्षण हेच खरे शिक्षण असे महात्मा गांधीजी यांचे मत होते.

भारतातील मुलांना 3H च्या माध्यामातून Head, Hand, Heart यातून शिक्षण देणे आवश्यक आहे. स्वावलंबनातूनच देश मजबूत होण्यास मदत होईल त्यामुळे भारतीय शिक्षणातील अभ्यासक्रम हा आर्थिक व्यवस्थेचा आधारक बनू शकेल असेही त्यांचे मत होते.

शिक्षण हे समाज बदलाचे साधन आहे यातूनच समाजाला नवी दिशा मिळू शकते. नुसते पुस्तकी ज्ञानातून मिळणारे शिक्षण हे सर्वांगीन विकास घड्वू शकत नाही तर बुध्दी मन आणि शरीर यांचा समतोल साधणारे शिक्षण हेच सर्वांगीन विकास घडविते असे त्यांचे ठाम मत होते.

**महात्मा गांधीजीची नई तालीम शिक्षण पध्द्ती:-**

नई तालीम ही अत्यंत महत्वपूर्ण अशी शिक्षण प्रणाली आहे. नई तालीम म्हणजेच मुलोगामी शिक्षण, मूलभूत शिक्षण, बुनियादी शिक्षण, जीवन शिक्षण होय. १९३७ साली गांधीजींनी नई तालीम योजना देशासमोर

मांडली. नई तालीम योजना देशासमोर मांडली नई तालीम म्हणजेचे 'वर्धा योजना' होय. स्वावलंबी शिक्षण विद्यार्थी केंद्री शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण जे वयवर्षे ७ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मोफत व सक्तीचे असेल.

त्यांचे शैक्षणिक विचार शिक्षणाच्या समकालीन विचारांशी जुळत नव्हते म्हणून सुरवातील त्यांच्या विचारांना विरोध झाला. परंतू गांधीजींनी सत्याचा पाठ पुरावा करणे थांबविले नाही त्यांच्या विचारातून ' नई तालीम प्रणाली विषयी आपले मत ते व्यक्त करतच राहिले. आज परिस्थिती अशी आहे की शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून भारत पूर्णत: साम्राज्यवादाखाली वावरत आहे, त्यामुळे नई तालीम म्हणजेच मुलभूत शिक्षण काळाची गरज बनत आहे.

१९३८ मध्ये कैंद्रीय सल्लगार मंडळाने बी. जी.च्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली वर्धा शिक्षण योजना / नई तालीम शिक्षण प्रणाली सर्व प्रांतिक सरकरांनी लागू करण्यासाठीची शिफारस केली.

झाकीर हुसेन कमिटीने महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांना व्यावहारीक आकार दिला व १९३८ मध्ये बेसिक एज्युकेशन (बुनियादी शिक्षा / मुलभूत शिक्षण) ही राष्ट्रीय शिक्षणाची पध्दती म्हणून स्विकारली गेली.

**नई तालीम शिक्षण पध्दतीची उद्दीष्ट्ये-**

नई तालीम शिक्षण पध्दतीची उद्दीष्टये पुढील प्रकारे मांडता येतील.-

**१) आर्थिक क्षेत्रातील उद्दीष्ट्ये**

**२) सामाजिक, राजनैतिक व नैतिक क्षेत्रासाठीचे उद्दीष्ट्ये-**

**१) आर्थिक क्षेत्रातील नई तालीम / मुलभूत शिक्षणाची उद्दीष्ट्ये**

अ) विद्यार्थाच्या भविष्यातील उपजीवकेवर लक्ष केंद्रीत करणे.

ब) विद्यार्थांच्या सार्वजनिक गरजा आणि औद्योगिक गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करणे.

**२) सामाजिक, राजनैतिक व नैतिक क्षेत्रासाठीचे उद्दीष्ट्ये -**

अ) मुलांना सामाजिक प्रशिक्षित करणे.

ब) मुलांना समाजातील सक्रिय कार्य कर्ता होण्यासाठी प्रशिक्षित करणे.

क) समाजसेवा करण्यासाठी नैतिक गुण नसे सहकार्य, प्रेम, परस्पर सहकार्य स्वंयशिस्त, स्वायत्तता अशा गुणांना प्रोत्साह्न देणे.

ड) स्वतंत्र भारताचा चांगला नागरीक होण्यासाठी भावना निर्माण होण्यासाठी शिक्षित करणे.

इ) मुलांमध्ये सहकार, सहकारिता आणि शिस्ती विषयीच्या सवयी लावणे.

क) सत्य, न्याय आणि अहिंसा यासारख्या सामाजिक राजकिय आणि मुलभूत सदगुणांचा विकास करणे.

ग) कृतितून शिक्षण देणे.

**नई तालीम / मुलभूत शिक्षणाची वैशिष्ट्ये-**

**१) विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्र बिंदू -**

मुलभूत शिक्षण पध्दती ही विद्यार्थी केंद्र शिक्षण पध्दती मानली आहे. ज्याम्ध्ये त्याच्या गरजेनुसार त्याला शिक्षण देणे अपेक्षित आहे. शाळेत येणारे प्रत्येक मुल हे विविध सामाजिक स्तरातून येत असल्यामुळे त्यांच्या गरजा या वेगवेगळ्या असतात. ह्या गरजा समजून घेवून त्यांच्या सर्वांगिन विकासासाठी आवश्यक प्रकारचे शिक्षण दिले गेले पाहिजे. ज्यातून त्यांच्या सर्जनशिल वृत्ती, अंत:प्रेरणा कल्पनाशक्ती आणि विचार शक्ती इत्यादींचा विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे.

**२) कृतितून शिक्षण -**

मुलभूत शिक्षन म्हणजे नई तालीम पध्दती ही कृती युक्त शिक्षणाला महत्व देते. मुलाला मिळणारे सर्व प्रकारचे ज्ञान हे त्यांच्या अनुभवाच्या आधारे देवून त्या अनुभावांची जोड ही शिक्षण्याला देणे हेच मुलभूत शिक्षणाचा पैलू आहे.

**३) हस्तकला शिक्षणाचा केंद्र मानून ज्ञान देणे -** नई तालीम हे विद्यार्थांच्या अंगी असलेल्या कला गुणांना वाव देणारी शिक्षण पध्दती आहे. ज्यामध्ये एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान देणे या शिक्षण प्रणालीचा महत्वाचा घटक

आहे. जसे एखाद्याला सुतार कामामध्ये आवड आहे. तर त्या मुलाला / विद्यार्थाला सुतारकामासाठी लागणाया लाकडा विषयीची पूर्ण माहिती, लाकडापासून कोणत्या वस्तू तयार करता येतील त्या वस्तूंच्या बनविण्यापासून विक्री पर्यंतचे कौश्यल्य विकसित करणे.

**४) संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास करणे. -**

बालकाचा शारिरीक, मानसिक भावनिक सामाजिक, नैतिक आणि आर्थिक विकास करणे हे नई तालीम शिक्षण प्रणालीचा प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार बालकाला त्यांचे आयुष्य सुख समाधानाचे व्यतित करण्यासाठी योग्य बनविने. हे या शिक्षणाचे वैशिष्ट्ये आहे.

**५) आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविणे.**

अंगभूत कौशल्याला शास्त्रीय जोड देवून शिक्षण घेवून परिपूर्ण असे व्यावसायिक निर्माण करणे व अर्थाजनातून स्वत:ची तसेच देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मदत करणे हे मुलभूत शिक्षणाचे महत्वाचा पैलू आहे. त्यामुळे स्वावलंबनाला बळकटी मिळेल.

**नई तालीम / मुलभूत शिक्षणाचा अभ्यासक्रम -**

मुलभूत शिक्षणाच्या अभ्यासक्रमात खालील प्रमाणे अंतर्भाव केला आहे

१) जीवनावश्यक हस्तकला शिक्षणाचा समावेश - जसे कृषी, शिवणकाम, भरतकाम, सुतारकाम, मातकाम, चर्मोद्योग, मत्सोद्योग, बागकाम, पाककला, गृहशास्त्र (पुस्तकबांधणी) यासारख्या स्थानिक व भौगोलिक परिस्थिती नुसार आवश्यक मुलोद्योगी शिक्षणाचा समावेश या अभ्यासक्रमात केला आहे.

२) गणित समाजशास्त्र, विज्ञान, कला (संगीत व चित्रकला) तसेच हिंदी आणि शारिरीक वशिक्षण या विषयांच्या समावेश या अभ्यास क्रमात केला आहे.

३) शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषाच असेल.

४) मुलभूत शिकवणाचा अभ्यासक्रम ७ वर्षाचा आहे.

५) ७ ते १४ वर्षा पर्यंतच्या सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण.

६) इ. ५ वी पर्यंत मुला मुलींसाठी सारखाच अभ्यासक्रम दिला गेला आहे.

७) इ. ६ वी व इ. ७ वी मध्ये मुलींना त्यांच्या इच्छेनुसार गृहशास्त्र विषय घेवू शकतात.

**नई तालीम शाळांचे वेळापत्रक :**

नई तालीम अंतर्गत भरणायाशाळा या दररोज किमान घड्याळी ५ तासांच्या असतील वेळेची विभागणी पुढीलप्रमाणे

| अ. क्रं. | विषय | वेळ |
|---|---|---|
| १) | मूलभूत हस्तकला शिक्षण | ३ तास २० मिनिटे |
| २) | मातृभाषा | ४० मिनिटे |
| ३) | संगीत चित्रकला | ४० मिनिटे |
| ४) | सामान्य विज्ञान, सामाजिक शास्त्रे | ३० मिनिटे |
| ५) | शारीरिक शिक्षण | १० मिनिटे |
| ६) | सुट्टी | १० मिनिटे |
| | **एकूण वेळ** | **५ तास ३० मिनिटे** |

अशा प्रकारे प्रत्येक शाळेमध्ये एका वर्षात किमान २८८ दिवस शालेय कामकाज व्हावे अशी अपेक्षा केली आहे.

**नई तालीम शिक्षण पध्दतीमध्ये शिक्षकाची भूमिका -**

नईतालीम शिक्षण पध्दतीमध्ये शिक्षकांची भूमिका ही अत्यंत महत्वपूर्ण अशी आहे. पूर्ण प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती या शिक्षन पध्दतीमध्ये आवश्यक मानले आहे. त्यामुळे शिक्षकांना दिले जाणारे प्रशिक्षण हे देखिल व्यवस्था या शिक्षण पध्दती नुसार सुचवलेली आहे.

१) **दिर्घकालीन प्रशिक्षण** - या प्रशिक्षणाचा कालावधी एकूण तीन वर्षाचा ठेवला आहे. जे प्रशिक्षित व अप्रशिक्षित दोन्ही प्रकारच्या व्यक्तीसाठी ठेवले आहे.

२) **अल्पकालीन प्रशिक्षण** - हे प्रशिक्षणाचा कालावधी एक वर्षाचा असून हे प्रशिक्षण फक्त अनुभवी व्यक्तींनाच घेता येईल कशी व्यवस्था केली आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. जयसिंगराव पवार, आधुनिक भारत अरूधंती प्रकाशन कोल्हापूर.

२) सुमित सरकार, आधुनिक भारत का इतिहास राजकमल प्रकाशन, दिल्ली.

३) महात्मा गांधी का शिक्षा दर्शन

४) सा इ. एल. (२०१६) नई शिक्षा दूरदध्वनी मार्च २०१६

५) सिंग ए. के. झी. ए. के. (२०१८) बुनयादी तालील व सामान्य विद्यालयों के सिखते - सिखाने की शैली का तुलनात्मक अध्ययन.